यशोगाथा.....

# कोकणच्या राजाने केले केदार बंधुंचे सोने



श्री. सुभाष केदार
सैंदापूर-हत्राळ, ता.-पाथर्डी, जिल्हा-अहमदनगर

डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांचे एक प्रसिद्ध असे वाक्य " तरुण वर्ग शेती व्यवसायाकडे वळत नाहीत, कारण सर्वात जास्त धोका अन कमी उत्पन्न असलेले क्षेत्र आहे, परंतु देशाचे भविष्य बंदुकीसह नसुन तर धान्यासोबत आहे कारण बंदुकी तुम्ही खरेदी करू शकता पण धान्य हे पिकवावेच लागते." अहमदनगर जिल्ह्यामधील कायमस्वरुपीच्या पाण्याच्या दुर्भिक्ष असलेल्या सैंदापूर-हत्राळ (ता. पाथर्डी) येथील रहिवासी असलेले सुभाष आणि संजय या केदार बंधूना हे वाक्य खूप भावले आणि त्यांनी सरकारी नोकरी सांभाळत आपल्यामधील प्रयोगशीलतेचा कायमच परिचय करून देत राहिले. केदार कुटुंबीयांनी एक तपापासून सहा एकरावर विविध जातींच्या आंबा फळबागेवर आपले संपूर्ण लक्ष केंद्रित केले आहे आणि सहा एकरातील आंब्यापासून लॉकडाऊन काळामध्ये सव्वा नऊ लाख रुपयांचे उत्पन्न घेतले. सेंद्रिय पद्धतीच्या शेती व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करत असताना शेततळे, विहीर अशा प्रकारचे बळकट सिंचन स्रोतही भक्कम करण्याचा प्रयत्न केला आहे.

अहमदनगर जिल्ह्यामधील पाथर्डी तालुक्यात असलेल्या सैंदापूर- हत्राळ येथील रहिवासी सुभाष आणि संजय केदार यांचे एकत्रित कुटुंब आहे. दोन्ही बंधू सरकारी नोकरीमध्ये आहेत. सुभाष केदार हे पंचायत समितीच्या बांधकाम विभागामध्ये तर संजय केदार हे रायगड जिल्ह्यामध्ये प्राथमिक शिक्षक आहेत. सुभाष यांचा चिरंजीव सौरभ याने नुकतीच कृषी जैवतंत्रज्ञान विषयामध्ये बीएस्सीची पदवी संपादन केली आहे. केदार बंधूंची वडिलोपार्जित ४८ एकर अवर्षणग्रस्त भागातील खडकाळ, सिंचनाचा अभाव असलेली शेती आहे.

### केदार बंधूंचे शेतीमधील विविध प्रयोग-

- केदार बंधुंनी पहिला प्रयोग २००० साली अतिशय बिकट परिस्थितीमध्येही २ एकरावर केळी पिकाची लागवड करत ३० पेक्षा जास्त टन उत्पादन काढून व्यापाऱ्यांना विक्री करत यशस्वी केला.
- २००५ साली तैवान ७८६ वाणाच्या पपईची लागवड केली. अहमदनगर, पाथर्डी, औरंगाबाद, बीड शेवगाव आणि परिसरातील बाजारपेठेत ३० ते ४० रुपये नग याप्रमाणे विक्री करत पंचक्रोशीत पहिलाच पण यशस्वी असा प्रयोग केदार बंधूनी केला.
- २००६ साली केदार बंधूंनी नवीन प्रयोग करून पाहायचे ठरवले आणि त्यांनी तब्बल ६ एकर खडकाळ जमिनीचे क्षेत्र आंबा फळबागेसाठी निवडले, त्यातून ते सध्या यशस्वीतेकडे वाटचाल करत आहेत.



- २०१३ या वर्षी सहा एकरावर एरंड पिक घेण्याचाही पाथर्डी तालुक्यातील पहिलाच प्रयोग केला, परंतु पाण्याचा अभाव आणि कामगारांची उपलब्धता वेळेवर न झाल्याने हा प्रकल्प अल्पावधीतच बंद करावा लागला.
- २०१६ या वर्षी पाण्याच्या दुर्भिक्षाला सामोरे जावे लागले. तब्बल एक लाख रुपयापर्यंत विकत पाणी घालून फळबाग जगवली. त्याच काळात सौरभच्या प्रयोगशीलतेने पाण्याचा प्रश्न सोडवण्यात यश मिळाले, या प्रयोगाची दखल घेत हिमाचल प्रदेश येथे आंतरराष्ट्रीय युवा शेतकरी पुरस्काराने सौरभला सन्मानित केले.

### खडकाळ जमिनीवर आंबा लागवड-



शेतीमधील असंख्य प्रयोगामधून केदार बंधुंच्या लक्षात आले की, फळपिकामधून आपल्याला मोठे यश मिळाले आहे आणि भविष्यातही मिळेल. पण, पाणी आणि मजुरांची समस्या कायम भेडसावत होती. या सर्व बाबी लक्षात घेवून अखेर २००६ मध्ये आंबा फळबागेकडे वळले.

त्यासाठी, ओढे नाले असलेल्या, ज्या ठिकाणी फक्त कुसळ उगवतात अशा खडकाळ ६ एकर जमिनीची निवड केल्यानंतर जमीन लेव्हल करून घेतली. जमिनीमधून होणाऱ्या विविध किडी आणि रोगांच्या प्रादुर्भावापासून बचाव करण्यासाठी फेब्रुवारी २००६ मध्ये १६ × ३० या अंतरावर १ × १ × १ मीटर खड्डे खणून घेतले. जुलै महिन्यामध्ये खड्ड्यांमध्ये तब्बल ६०० ट्रॉली तलावातील गाळाची माती वापरून खते, पाणी आणि इतर नियोजनातून फळबागेची लागवड केली. फळ बागेसाठी केशर वाणाची ३२०, तोतापुरी वाणाची १४, हापूस वाणाची ६० तर सदाबहारची १५ अशा प्रकारे ४१० आंब्याच्या झाडाची लागवड केली. आंब्याच्या लागवडीनंतर ३ वर्षांनी पहिले पिक हाती आले.



पहिल्यावर्षी तीन क्विंटल उत्पादन निघाले. बागेमध्ये जागेवर शंभर रुपये प्रति किलो दराने हातविक्री केली. दुसऱ्यावर्षी ५० झाडांपासून सात क्विंटल उत्पादन निघाले. हळूहळू झाडांच्या उत्पादन क्षमतेत आणि उत्पादनक्षम झाडांच्या संख्येत वाढ होत होती, तशी उत्पादनात वाढ होत होती. गेल्यावर्षी दुष्काळाच्या फटक्यामुळे २६० ते ३२० झाडापासून साडेपाच टन उत्पादन मिळाले. यंदा मात्र फळबागेसाठी पूरक असे हवामान, पाण्याची मुबलकता, लॉकडाऊनमुळे केदार परिवाराला फळबाग नियोजनासाठी मिळालेला वेळ, आणि मार्केटच्या अभ्यासानुसार विक्री केली. आंब्याच्या चवीमुळे आणि नैसर्गिक पद्धतीने पिकवण्याच्या पद्धतीमुळे आंब्याची मागणी चांगली राहिली. केशर व हापूस आंब्याच्या कच्च्या कैरीची किंमत ११३ ते १३० रुपये प्रति किलो असे दर राहिले.



### रासायनिक ऐवजी सेंद्रिय शेतीवर भर-

आंबा फळबागेमध्ये सुरुवातीला रासायनिक खतांचा वापर केला, परंतु मागील ६ वर्षात जैविक आणि सेंद्रिय खतांचा वापर करत आहेत. प्रति झाड चार किलो जैविक, तर दोन किलो शेणखत दरवर्षी दिले जाते. गरजेनुसार शेणखत विकत घेतले जाते. सेंद्रिय पद्धतीच्या वापरामुळे आंब्याच्या गुणवत्तेत, चव आणि टिकवण क्षमतेमध्ये वाढ झाली आहे.

### विहीरीने आधार तर ठिबकमुळे मोठा फायदा-

पाथर्डी तालुक्यामधील मोठा भाग दरवर्षी पाणी टंचाईच्या झळा सोसत असतो. गावाला हत्राळ सैदापूर परिसरातील पाझर तलावाचा आधार आहे, केदार परिवाराची एक विहीर तलावानजीक आहे आणि इतर दोन विहिरी तसेच ५० लाख लिटर क्षमतेचे शेततळे आहे. या सर्वांमधून उपलब्ध होणाऱ्या पाण्यामधून शेतीला पाणी पुरवले जाते. २०१३-१४ साली पडलेल्या कडक दुष्काळामध्ये पाथर्डी तालुक्यातील बहुतांश आंबा, डाळिंब फळबागा वाया गेल्या. परंतु झाडांना तग धरण्यासाठी केलेल्या ठिबक सिंचनाचा आणि शेततळ्याचा मोठा फायदा झाल्याने झाडांना कठीण परिस्थितीमध्येही जगवता आले.



### फळ बागेमधील आंतरपिके-

आंब्याच्या बागेमध्ये पहिली दोन वर्ष आंतरपिके घेतली. त्यामध्ये पहिल्यावर्षी मटकी व त्यानंतर दुधी भोपळ्याची लागवड केली. पाथर्डी, तिसगाव, शेवगाव, अहमदनगर येथील बाजारात हात विक्री केली. दोन्ही पिकांमधून आर्थिक हातभार लागला.

> "पाथर्डी तालुक्यात कायम दुष्काळ आहे. हा भाग दुर्भिक्षछायेमध्ये असूनही सचोटीचे प्रयत्न केल्याने धरणी मातेकडून भरघोस उत्पन्न मिळते. दर्जेदार उत्पादनामुळे फळबागेला चांगली बाजारपेठ मिळत आहे. येत्या काळामध्ये कृषी पर्यटन उभारण्याचे आणि १५ एकर पेरूची आणि ५ एकर सीताफळाची फळबाग लागवड करण्याचे नियोजन आहे."
>
> \- सुभाष केदार

(संपर्क: +९१ ९४२३७५६७२७)

★★★